# Bharatiya Janata Party
# भारतीय जनता पार्टी

## ७/११ मुंबई बॉम्बस्फोटांतील १०८१ बळींच्या जखमांवर फुंकर घालणारा हात

११ जुलै २००८ च्या मुंबई बॉम्बस्फोटात वळी पडलेल्यांच्या जखमा सौम्य करणारा हात अखेर त्याना लाभला आहे. सतत प्रयत्न, पाठपुरावा आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग यांनी लक्ष ठेवल्यामुळे ह्या बळींना अर्थिक भरपाई मिळणार आहे. येथे नोंद घेणे आवश्यक आहे कि, १४ ऑगस्ट २००६ रोजी डॉ. किरिट सोमैय्या, श्री. गोपाळ शेट्टी, श्री. पराग अळवणी ह्या भाजप नेत्यांनी वळींच्या समवेत मानवाधिकार आयोगाचे दार ठोठावले होते.

डॉ. किरिट सोमैय्या यांना पश्चिम रेल्वेकडून प्राप्त झालेल्या उत्तरानुसार, १०८१ बळीपैकी १०६७ ना आर्थिक नुकसान भरपाई देण्यात आली आहे. रेल्वेने मृतांच्या वारसांना रु. ५ लाख आणि गंभीररित्या जखमी झालेल्यांना रु. ५०,००० देऊ केले आहेत.

ही दुःखाची बाब आहे कि राज्य सरकारने सानुग्रह अनुदान (तातडीची मदत) देण्यात अनावश्यक दिरंगाई दाखविली आहे. दोन महिन्यांपूर्वी म्हणजे जवळजवळ १८ ते २२ महिन्यांच्या संघर्षानंतर, गंभीररित्या जखमी झालेल्या २१२ व्यक्तिना रु. ५०.००० ची भरपाई मिळाली आहे.

**हे दुःखदायक आहे कि, अनेक निवेदने करून, विधानसभेत वचन देऊन सुद्धा राज्य सरकारने गंभीररित्या जखमी झालेल्या ५७३ व्यक्तिच्या वैद्यकीय उपयाचारांसाठी, शस्त्रक्रियेसाठी, कृत्रिम अवयवांच्या रोपणासाठी एक पैसाही खर्च केलेला नाही.**

डॉ. सोमैय्यांनी समाधान व्यक्त केले कि किमान रेल्वेने तरी संघर्ष आणि मानवाधिकार आयोगाच्या आदेशानंतर. तातडीच्या वैद्यकीय उपचारांची/खर्चाची व्यवस्था केली. रेल्वेने वैद्यकीय उपचारांसाठी रु. ३.४५ कोटी खर्च केले.

ह्याची नोंद घ्यावी कि आजही दोन व्याक्ति कोमात आहेतः

१. श्री. पराग सावंत - हिंदुजा रुग्णालय
२. श्री. अमित सिंग– जसलोक रुग्णालय

रेल्वे क्लेम्स ट्रिब्यूनलमध्ये खास बेंच

हा विक्रम आहे. नोंद घेण्यात यावी कि १०८१ बळीपैकी, ७४२ बाधित व्यक्तिनी त्यांचे दावे/प्रकरणे रेल्वे क्लेम्स ट्रीब्यूनल, छ.शि.ट. मुंबई यांच्याकडे दाखल केले होते. आतापर्यंत, ७११ दाव्यात तडजोड झाली आहे. ७०० व्यक्तिंना पैशांचे वाटप करण्यात आले आहे. हे शक्य झाले ते केवळ मुंबई आरसीटी येते निर्माण करण्यात आलेल्या खास बेंचमुळे. हे खास बेंच आदरणीय श्री लालकृष्ण अडवाणी यांच्या हस्तपक्षेपामुळे निर्माण करण्यात आले होते. श्री अडवाणी यांनी मदत आणि पुनर्वसनाच्या कामात विशेष रस घेतला होता. त्यांनी हा विषय पंतप्रधान, रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष आणि इतरांकडे उपस्थित केला होता.

यातील दुःखाचा भाग मृतांच्या आणि कायमस्वरुपी अपंगत्व आलेल्यांच्या वारसांना रोजगार पुरविण्याबाबत आहे. १८ृत आणि ७३ अपंग यांच्यापैकी केवळ ७० जणांना रेल्वेने नोकरी दिली आहे ती सुद्धा ड प्रवर्गातील, म्हणजेच बदली चपरासी, हमाल, वगैरे. त्यांचा पगार सुमारे रु. ४००० ते ६००० दरमहा आहे. येथे नोंद घेण्यात यावी कि स्फोट्ट पहिल्या वर्गाच्या डब्यात झाले होते. अशा नोकऱ्या देणे म्हणजे लोकांच्या जखमेवर मीठ चोळणेच आहे.

***जुलै ४, २००८*** ***प्रसिद्धी सचिव***